**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies**
Online ISSN 2278-8808, SJIF 2024 = 8.153
https://www.srjis.com/issues_data/231
Peer Reviewed & Refereed Journal, MAR-APRIL 2024, Vol- 12/82

# अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांची परिणामकारकता, समायोजन व कार्यसमाधानतेचे मापन

**लांडे पुष्पा शिवराम**

*संशोधक*

**प्रा. डॉ. रवींद्र मारुती चोभे**

*विद्या प्रतिष्ठान कॉलेज ऑफ एज्युकेशन, अहमदनगर*

**Paper Received On**: 20 March 2024

**Peer Reviewed On**: 24 April 2024

**Published On:** 01 May 2024

**Abstract**

*शिक्षकांच्या अध्यापनाची परिणामकारकता ही त्यांचा विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या ज्ञानाचा वापर कसा केला यावरच अवलंबून असते. म्हणजेच विद्यार्थ्यांची प्रगती हीच शिक्षकांच्या कार्यसमाधानाची खरी पावती होय. अध्यापक शिक्षण घेणारे नवीन प्रशिक्षणार्थी हे आपल्या उज्वल राष्ट्राचे भविष्य निर्माण करणारे आहेत. या नवीन शिक्षकांच्या हातून राष्ट्राची खरी संपत्ती निर्माण होणार आहे 'शिक्षक प्रशिक्षणावर केलेला खर्च हीच खरी देशाच्या विकासाची शिदोरी आहे.' म्हणजेच आपल्या कामाचे समायोजन करून अध्यापन प्रक्रिया परिणामकारक करण्यासाठी शिक्षकांना कामात समाधानी रहावे लागते. कामाविषयी समायोजन करून समाधान मानणाऱ्या शिक्षकांचे अध्यापन परिणामकारकच होते यात कोणतेही दुमत नाही.*

## १. प्रस्तावना

चांगले विद्यार्थी घडवायचे असतील तर चांगले शिक्षक घडविणे आवश्यक आहे. शिक्षणप्रक्रियेच्या पाठीचा कणा म्हणून शिक्षकांची ओळख आहे. माणसाला जीवनात जे अनुभव येत असतात, त्यानुसार त्यांच्या विचारात, वर्तनात सुधारणा होत असते. सध्या देशासमोर शिक्षणाचा विस्तार, शिक्षणाचे सार्वत्रिकरण, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास यासाठी काही महत्त्वाची आव्हाणे आहेत. काळानुसार शिक्षकांचे स्थान बदलत चालले आहे, आजच्या स्पर्धात्मक युगात आपल्या विद्यार्थ्यांना सर्व अडचणींना यशस्वीपणे सामोरे जाता यावे म्हणून सर्वच शिक्षक मनापासून प्रयत्न करताना दिसतात. "एखादे

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

कार्य निश्वार्थ भावनेने केल्यानंतर जेवढे समाधान मिळते, तेवढे समाधान इतर कामात मिळत नाही."हे विधान जेवढे सत्य आहे तेवढेच सत्य शिक्षकांच्या अध्यापनाचे काम आहे असेच म्हणावे लागेल.

**२. संशोधन समस्येचे विधान**

"महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर जिल्हयातील मराठी माध्यमांच्या अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांच्या परिणामकारकता, समायोजन, कार्यसमाधानतेच्या प्रमाणीत चाचण्यांचा गुणांकांचा सहसंबंधात्मक अभ्यास करणे."

**३. संशोधनाची गरज व महत्त्व**

शिक्षकांनी आपल्या कामाशी केलेल्या समायोजन, कार्यसमाधानाविषयी जाणिव करून घेणे, तसेच शिक्षकांच्या परिणामकारकतेचा अभ्यास करण्यासाठी सदर संशोधन गरजेचे आहे. शिक्षकांची परिणामकारकता, समायोजन आणि कार्यसमाधानता यांचा एकमेकांशी असणारा संबंध जाणून घेण्यासाठी सदर संशोधन गरजेचे आहे. शिक्षकांची परिणामकारकता, समायोजन व कार्यसमाधानतेविषयी सखोल ज्ञान मिळवणे आणि केलेल्या कामाचे समायोजन केल्याने कामाविषयी समाधान मिळून त्यांच्या परिणामांची जाणीव करून घेण्यासाठी सदर संशोधन महत्त्वाचे आहे.

४. **संशोधनाची उद्दिष्टे**

१. अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांची परिणामकारकता, समायोजन व कार्यसमाधानतेचे मापन करणे.

२. अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांची परिणामकारकता व समायोजन यांमधील सहसंबंध शोधणे.

३. अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांचे समायोजन व कार्यसमाधानता यांमधील सहसंबंध शोधणे.

४. अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांची परिणामकारकता व कार्यसमाधानता यांमधील सहसंबंध शोधणे.

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**५. संशोधन प्रश्न**

१. शिक्षकांची परिणामकारकता, समायोजन आणि कार्यसमाधानता यांमधील सहसंबंध किती प्रमाणात आहे?

**६. संशोधन परिकल्पना**

**अ. संशोधन परिकल्पना**

१. अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांची परिणामकारकता व समायोजन यांच्या गुणांकांत सार्थ सहसंबंध आहे.

२. अध्यापक महाविद्यालयातील शि्क्षकांचे समायोजन व कार्यसमाधानता यांच्या गुणांकांत सार्थ सहसंबंध आहे.

**ब.शून्य परिकल्पना**

१. अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांची परिणामकारकता व समायोजन यांच्या गुणांकांत सार्थ सहसंबंध आढळतनाही.

२. अध्यापक महाविद्यालयातील शि्क्षकांचे समायोजन व कार्यसमाधानता यांच्या गुणांकांत सार्थ सहसंबंध आढळत नाही .

**७. संशोधनाची गृहीतके**

१. शिक्षकांची परिणामकारकता, कार्यसमाधानता ही चले मोजता येतात. (जयशंकर,१९८९)

२. शिक्षकांची परिणामकारकता, व कार्यसमाधानता ही वेगवेगळया स्वरूपाची असते.(जयशंकर,१९८९)

**८. संशोधनातील कार्यात्मक व्याख्या**

**कार्यात्मक व्याख्या**

**१. शिक्षकांची परिणामकारकता**

सदर संशोधनाची शिक्षकांची परिणामकारकता म्हणजे डॉ. प्रमोदकुमार आणि डॉ. डी.एन.मुथ्था यांच्या शिक्षकांची परिणामकारकता मोजणाऱ्या प्रमाणित चाचणीतील शैक्षणिक, सामाजिक, नैतिक, व्यावसायीक, आर्थिक इ. घटक होय.

Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**२. समायोजन**

सदर संशोधनात समायोजन म्हणजे एस. के. मंगल यांची शिक्षकांच्या समायोजनाविषयी असलेल्या प्रमाणित चाचणीतील वैयक्तीक, सामाजिक, कौटुंबिक, शालेय घटक होय.

**३. कार्यसमाधानता**

सदर संशोधनाची कार्यसमाधानता म्हणजे अमर सिंग आणि टी. आर. शर्मा यांची शिक्षकांची कार्यसमाधानता मोजणाऱ्या प्रमाणित चाचणीतील अंतर्गत घटक ( शैक्षणिक कामाचे ठिकाण, परिस्थिती, सहकार्यात्मक कार्य, वैयक्तीक कार्य ) व बाहय घटक ( वेतन, भत्ते, बुध्दीमत्ता, सामाजिक, राष्ट्रीय, आर्थिक घटक ) इ. घटक होय.

**९. संशोधनाची व्याप्ती,मर्यादा व परिमर्यादा**

**संशोधनाची व्याप्ती**

सदर संशोधनाच्या अभ्यासाची व्याप्ती अध्यापक महाविद्यालयात अध्यापन करणाऱ्या शिक्षक व शिक्षकांची परिणामकारकता, समायोजन आणि कार्यसमाधानता या घटकांशी संबंधीत आहे.

**संशोधनाच्या मर्यादा**

सदर संशोधन अध्यापक महाविद्यलयात अध्यापन करणाऱ्या शिक्षकांची परिणामकारकता, समायोजन व कार्यसमाधानता यांच्या प्रमाणित चाचणीतील मापनावरून येणाऱ्या निष्कर्षापुरते मर्यादीत आहे. तसेच संशोधनाचे निष्कर्ष हे प्रतिसादकांने दिलेल्या प्रतिसादावर अवलंबून आहे.

**संशोधनाच्या परिमर्यादा**

सदर संशोधन हे अहमदनगर जिल्हयातील अध्यापक महाविद्यालयात काम करणाऱ्या २७ अध्यापक महाविद्यालयापैकी १४ अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांपुरतेच मर्यादीत आहे. तसेच संशोधन हे फक्त शिक्षकांची परिणामकारकता, समायोजन व कार्यसमाधानतेच्या सहसंबंधाशी निगडीत आहे.

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

## १०. संबंधित साहित्य व संशोधनाचा आढावा

| अ.क्र | शीर्षक | संशोधक | स्तर | संशोधनासाठी उपयोग |
|---|---|---|---|---|
| 1 | उच्च माध्यमिक शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेच्या संदर्भात कार्यसमाधानता व अध्यापन परिणामकारकतेचा सहसंबंधात्मक अभ्यास. | कोठावदे प्रविण (जानेवारी २०१०) | (पी.एच डी) | प्रस्तावना, उद्दिष्टे,गृहितके, साधन. |
| 2 | Mental health and adjustment problems of student of navodhya, central and state school | V.Srividhya | Journal | Adjustment माहिती व सर्वेक्षण पध्दती माहिती |
| 3 | Teachers' job satisfaction levels. | Zulfu Demirtas | Journal | चाचणी माहिती, गरज आणि विश्लेषण साधण |
| 4 | म्हैसूर राज्याच्या शालेय शिक्षकांच्या परिणामकारकतेच्या संदर्भात भाकित करणाऱ्या शोधिकेची संरचना व प्रमाणिकरण | जयम्मा एम. एस. (१९६२) | (पी.एच डी) | शिक्षकांची परिणामकारकता माहिती, संकलन साधन, |

## ११. संशोधन पध्दती

| उद्दिष्टे | संशोधन पध्दती | जनसंख्या | नमुना |
|---|---|---|---|
| अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांची परिणामकारकता, समायोजन व कार्यसमाधानतेचे मापन करणे. | सर्वेक्षण पध्दती | महाराष्ट राज्यातील अहमदनगर जिल्हयातीलपुणे विद्यापीठ संलग्नीत २७ अध्यापक महाविद्यालयात अध्यापनाचे काम करणारे १८९ शिक्षक म्हणजेच सदर संशोधनाची जनसंख्या आहे. | महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर जिल्हयातील पुणे विद्यापीठ संलग्नीत १४ अध्यापक महाविद्यालयात अध्यापनाचे काम करणारे ८० शिक्षक हे सदर संशोधनाचा नमुना आहे. |
| अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांची परिणामकारमता व समायोजन यांमधील सहसंबंध शोधणे. | सहसंबंध गुणांक | | |
| अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांचे समायोजन व कार्यसमाधानता यांमधील सहसंबंध शोधणे. | सहसंबंध गुणांक | | |
| अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांची कार्यसमाधानता व शिक्षकांची परिणामकारकता यांमधील सहसंबंध शोधणे. | सहसंबंध गुणांक | | |

Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**१२. माहिती विश्लेषणाची संख्याशास्त्रीय तंत्रे**

**अ).मध्यमान(** शिक्षकांची परिणामकारकता, समायोजन व कार्यसमाधानता या चलांचे मध्यमान )

**ब).प्रमाण विचलन(** शिक्षकांची परिणामकारकता, समायोजन व कार्यसमाधानता या चलांचे प्रमाण विचलन )

**क).पिअरसन सहसंबंध गुणांक(** शिक्षकांच्या परिणामकारकतेचा समायोजनाशी, समायोजनाचा कार्यसमाधानतेशी व शिक्षकांच्या परिणामकारकतेचा कार्यसमाधानतेशी असणारा सहसंबंध)

**१३. शिक्षकांच्या परिणामकारकतेनुसार मापन**

- **अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांच्या परिणामकारकतेच्या प्राप्तांकाचे वितरण**

| अ.क्र | वर्गांतरे | वारंवारिता |
|---|---|---|
| 1 | 341-355 | 7 |
| 2 | 326-340 | 14 |
| 3 | 311-325 | 19 |
| 4 | 296-310 | 20 |
| 5 | 281-295 | 11 |
| 6 | 266-280 | 7 |
| 7 | 251-265 | 1 |
| 8 | 236-250 | 0 |
| 9 | 221-235 | 1 |
| | एकुण | 80 |

- **अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांच्या परिणामकारकतेचा स्तंभालेख**




*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

सारणी व आलेखावरून असे लक्षात आले की, अध्यापक महाविद्यालयात काम करणाऱ्या शिक्षकांच्या परिणामकारकतेच्या संदर्भात २९६–३१० या वर्गान्तरात सर्वात जास्त म्हणजे ८० पैकी २० शिक्षकांच्या परिणामकारकतेचे प्राप्तांक सामावलेले आहे.

**१४. सहबंधात्मक अभ्यास**

- **अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांची परिणामकारकता व समायोजनाचा सहसंबंधात्मक अभ्यास**

| अ.क्र. | चलाचे नाव | नमूना | सहसंबंध |
|---|---|---|---|
| 1 | शिक्षकांची परिणामकारकता व समायोजन | 80 | 0.279 |

सारणी वरून असे लक्षात येते की, अध्यापक महाविद्यालयात काम करणाऱ्या **शिक्षकांची परिणामकारकता व समायोजन** या दोन चलांतील सहसंबंध हा **धन स्वरूपाचा** आहे. शिक्षकांची परिणामकारकता आणि समायोजन यातील सहसंबंध ±0.20 to ±0.39या गटाच्या दरम्यान असून तो **बरा सहसंबंध** आहे. अहमदनगर जिल्हयातील मराठी माध्यमाच्या अध्यापक महाविद्यालयात काम करणाऱ्या शिक्षकांची परिणामकारकता व समायोजन यातील सहसंबंध गुणांक हा स्वाधीनता मात्रेच्या 0.05स्तरावर **सार्थ** आहे.

- **अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांचे समायोजन व कार्यसमाधानतेचा सहसंबंधात्मक अभ्यास**

| अ.क्र. | चलाचे नाव | नमूना | सहसंबंध |
|---|---|---|---|
| 1 | शिक्षकांचे समायोजन व कार्यसमाधानता | 80 | 0.435 |

सारणीवरून असे लक्षात येते की, अध्यापक महाविद्यालयात काम करणाऱ्या **शिक्षकांचे समायोजन व कार्यसमाधानता** या दोन चलांतील सहसंबंध हा **धन स्वरूपाचा** आहे. शिक्षकांचे समायोजन व कार्यसमाधानता यातील सहसंबंध ±0.40 to ±0.59या गटाच्या दरम्यान असून तो **मध्यम प्रतिचा सहसंबंध** आहे. अहमदनगर जिल्हयातील मराठी माध्यमाच्या अध्यापक महाविद्यालयात काम करणाऱ्या शिक्षकांची

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

परिणामकारकता व समायोजन यातील सहसंबंध गुणांक हा स्वाधीनता मात्रेच्या 0.05स्तरावर **सार्थ** आहे.

- **अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांची परिणामकारकता व कार्यसमाधानतेचा सहसंबंधात्मक अभ्यास**

| अ.क्र. | चलाचे नाव | नमूना | सहसंबंध |
|---|---|---|---|
| 1 | शिक्षकांची परिणामकारकता व कार्यसमाधानता | 80 | 0.429 |

सारणी वरून असे लक्षात येते की, अध्यापक महाविद्यालयात काम करणाऱ्या **शिक्षकांची परिणामकारकता वकार्यसमाधानता**या दोन चलांतील सहसंबंध हा **धन स्वरूपाचा** आहे. शिक्षकांची परिणामकारकता आणि कार्यसमाधानता यातील सहसंबंध ±0.40 to ±0.59या गटाच्या दरम्यान असून तो **मध्यम प्रतिचा सहसंबंध** आहे. अहमदनगर जिल्हयातील मराठी माध्यमाच्या अध्यापक महाविद्यालयात काम करणाऱ्या शिक्षकांची परिणामकारकता व कार्यसमाधानतायातील सहसंबंध गुणांक हा स्वाधीनता मात्रेच्या 0.05स्तरावर **सार्थ** आहे.

**१५. संशोधनाचे निष्कर्ष**

- अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांची परिणामकारकता व समायोजन यांमधील सहसंबंध **धन स्वरूपाचा असून तो बरा** सहसंबंध आहे.
- अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांचे समायोजन व कार्यसमाधानता यांमधील **सहसंबंध धन स्वरूपाचा असून तो मध्यम सहसंबंध** आहे.
- अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांची कार्यसमाधानता व शिक्षकांची परिणामकारकता यांमधील **सहसंबंध धन स्वरूपाचा असून तो मध्यम सहसंबंध** आहे.

**२१ .शिफारशी**

१. शिक्षकांचे अध्यापन परिणामकारक होण्यासाठी शिक्षक प्रशिक्षकांनी कायम समायोजन करण्याचे प्रयत्न करावे.

२. शिक्षकांची परिणामकारकता, समायोजन व कार्यसमाधानता यामध्ये कमी सहसंबंध असणाऱ्या अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांनी परिणामकारकता वाढवून कार्यसमाधानता सुधारण्यासाठी कार्यक्रम राबविणे.

३. महाविद्यालयातील शिक्षकांना कामात समाधानी ठेवण्यासाठी तसेच शैक्षणिक परिणामकारकता वाढविण्यासाठीचे विविध उपक्रम तयार करावेत.

**संदर्भ ग्रथ**

***MangalS. K.*** *(Oct,2010), Statistics in Psychology and Education, PHI Learning Private Limited, New Delhi.*

***कुंडले म. बा*** *(१९९०), शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, नुतन प्रकाशन,पुणे.*

***भिंताडे वि.रा.*** *(२००८), शैक्षणिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, पुणे.*

***मुळे रा. श. व उमाठे वी. तु.*** *(१९९८), शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे, विद्या प्रकाशन, औरंगाबाद.*

***Hechuan Sun, Hong Zheng &Yang Wang*** *,(Paper) Educational Effectiveness Research in Mainland China .[5th World Conference on Educational Sciences - (WCES 2013).*

***कोठावदे लक्ष्मण*** *(२०१०), उच्च माध्यमिक शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेच्या संदर्भात कार्यसमाधानता व अध्यापन परिणामकारकतेचा सहसंबंधात्मक अभ्यास.*

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*